Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - " Pedagogy And Teaching Learning "

# अध्यापनाचे नवे अविष्करण : – आंतरक्रियात्मक अध्यापन

प्रा. डॉ. एस. आर. भालेराव,
असोसिएट प्रोफेसर,
ॲड. व्ही. एच. शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
नाशिक – २

**अध्यापनाचा अर्थ :–**(Meaning of Teaching)

अध्यापन हा शब्द इंग्रजीतील Teaching या शब्दासाठी वापरला जातो इंग्रजी शब्दकोषामध्ये Teaching चा अर्थ The artassisting another to learn असा दिला आहे. म्हणजेच एखादया व्यक्तिला अध्यापन करण्यास मदत करणारी कला म्हणजे अध्यापन होय.

१. डिक्शनरी ऑफ एज्यूकेशन :– बालक अथवा प्रौढ विदयार्थ्याला एखादया शैक्षणिक संस्थेत पाठविणे, शिकविणे.

२. दि वर्ल्ड बूक एनसायक्लोपिडीया :– अध्यापन म्हणजे एका व्यक्तिने दुस–या व्यक्तिला ज्ञान, कौशल्य व कला संपादन करण्यास मदत करणारी प्रक्रिया होय.

३. जॅकेटॉट :– ''To teach is to cause to learn''

४. बर्टन :– अध्यापन म्हणजे अध्ययनाला चालना देणे, मार्गदर्शन करणे दिशा देणे आणि प्रोत्साहन देणे होय.




अध्यापन प्रक्रियेत तीन प्रश्नचिन्हे उभी राहतात ते म्हणजे Why, What and How- का शिकवायचे? म्हणजे शिक्षणाची

उद्दिष्टे साध्य करायचे, काय शिकवायचे? याचे उत्तर अभ्यासक्रम तसे कसे शिकवायचे? यासाठी अध्यापनशास्त्राची गरज लागते शैक्षणिक तत्वज्ञानाने ठरवून दिलेली उद्दिष्टे साध्य कशी करावयाची त्यासाठी अध्यापन कसे करावयाचे कोणकोणत्या अध्यापन पद्धतीचा अवलंब करावयाचा, तो कोणत्या स्वरुपात करायचा? तसेच अध्यापन परिणामकारक व्हावे, सफल व्हावे म्हणून कोणता प्रयत्न करावयाचा? कोणकोणत्या बाबी विचारात घ्यायच्या? यासाठी जेरॉम ब्रूनर यांनी अध्यापनशास्त्राचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे केले आहे

''A theory of instruction is prescriptive, because it establishes rules concerning the best ways to teach knowledge and skills, normative because it sets criteria and states the conditions for meeting these rules and descriptive because it tells what has happened in the instructional process''

**प्रगतअध्यापन :–**

१.अध्यापनशास्त्र हे शिक्षणाचे शास्त्र व कलात्मक अंग आहेअध्यापन शास्त्राचा विस्तार हा व्यक्ति च्या सर्वांगिण विकासापासून ते व्यक्तिने कौशल्य आत्मसात करेपर्यंत आहे

– अध्यापनशास्त्रात विविधअ ध्यापनपद्धतींचा व विविध कृतींचा समावेश होतो

– अध्यापनशास्त्र हे अध्ययनासाठी असणारेअध्यापनहोय

– अध्यापनशास्त्र हे अनुदेशनासाठी पद्धती व तत्त्वे यांचा संच होय

– अध्यापनशास्त्र हे शैक्षणिक विषयांच्या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी असणारे अध्यापन असून त्यातअनेक पद्धतीआणि सराव कार्यांचा समावेश असतो

- Pedogoy is the science and art of education. Its aim range from the full development of the human being.

वरील सर्व बाबींचा विचारकेला असता अध्यापन शास्त्र हे शिक्षणाचे अंग असून त्यात कला व शास्त्राचा विचार केला जातो अध्यापन शास्त्रातून प्रामुख्याने विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाबरोबर, कौशल्य विकसित करून त्यांच्या जीवनातील कुठल्याही बाबींकडे बघण्याचा दृष्टिकोन विकसित करणे होय या दृष्टिने प्रगत अध्यापन शास्त्रात आंतरक्रियात्मक वापर केला जातो

**आंतरक्रियात्मक अध्यापन :– अर्थ (meaning of Interactive Teaching)**

आंतरक्रियात्मक, अध्यापनही शिक्षणशास्त्रातील नवीन गूढ किंवा रहस्यमय संकल्पनानाही बहुतांशी शिक्षकांनाही संकल्पना परिचयाची आहे शिक्षक वर्गात वर्गाध्यापनाचा प्रश्न विचारून, शाब्दिक किंवा कृतीयूक्त सहभाग घ्येण्याचा प्रयत्न करीत असतात या सर्व कृतींच्या माध्यमातून आंतरक्रियात्मक अध्यापन घडून येत असते म्हणूनच वर्गाध्यापनात आंतरक्रिया घडवून आणणारे शिक्षक चांगले शिक्षक म्हणून ओळखले जातात

आंतरक्रिया अध्यापनातपुढील बाबीघडून येतात

शिक्षक ⟷ विद्यार्थी

विद्याथ ्री⟷ विद्यार्थी

शिक्षक ⟷ अनेक विद्यार्थी

विद्यार्थी ⟷ अध्यापनसाहित्य

वरील बाबींवरून असे दिसून येते की आंतरक्रियात्मक अध्यापनही द्विमार्गी प्रक्रियाआहे या आंतरक्रियेच्या माध्यमातून माहिती, ज्ञान यांची देवाण घेवाण होत असते विदयार्थ्यांच्या गरजा लक्षातघेऊन शिक्षक आपल्या वर्तनात बदल करीत असतात शिक्षक फक्त मदतनीस असतो आंतरक्रिया घडवून आणण्यासाठी विविध तंत्रांचा वापरकेला जातो आंतरक्रिया अध्यापनात विदयार्थ्यांना अध्ययन अध्यापनात सहभागी होण्यास प्रोत्साहीत करून स्वावलंबी बनविले जाते विदयार्थ्यांच्या कल्पनाशक्ती व विचार शक्तिस चालना दिली जाते विद्यार्थ्यांना प्रभावी संभाषण कौशल्य अवगत होण्यासाठी, आत्मविश्वास निर्माण करून वाढविण्यासाठी व वर्गाध्यापनात सक्रिय सहभाग घेण्यासाठी आंतरक्रियात्मक अध्यापन उपयूक्त ठरते

वर्गाध्यापनात विदयार्थ्यांचा सक्रिय सहभाग होण्यासाठी, ज्ञानाची देवाण घेवाण करण्यासाठी, विविध तंत्रांचा वापर करून वर्गात आंतरक्रिया घडवून आणण्याचा प्रयत्न ज्या अध्यापनातून केला जातो त्यास आंतरक्रिया अध्यापन असे म्हणतात




**आंतरक्रियात्मक अध्यापनाची वैशिष्टये :–**

१. आंतरक्रियात्मक अध्यापन ही गतीमान प्रक्रिया आहे
२. विदयार्थ्यांच्या शाब्दिक अशाब्दिक कृतीयूक्त सहभाग घेऊन अध्यापन करता येते
३. शिक्षक विविध आंतरक्रियांच्या माध्यमातून विदयार्थ्यांच्या वेगवेगळया स्वरूपात घेण्याचा प्रयत्न करीत असतात
४. माहिती संप्रेषणापेक्षा कौशल्य विकसनास महत्त्व
५. विदयार्थी उच्च प्रक्रियेत गुंतलेले असतात
६. आव्हान निर्माण करून विचारास संधी दिली जाते
७. विदयार्थी केंद्रित अध्ययन–अनुभव दिले जातात
८. विविध उपयुक्त चर्चा, कृतीद्वारे अध्ययन घडते

९. शिक्षकांची गरजेनुरूप भूमिका बदलते

१०. विदयार्थ्यांच्या भूमिकेत विविधता दिसून येते

**आंतरक्रिया अध्यापनाची गरज :-**

आंतरक्रिया अध्यापन हे आज स्पर्धेच्या यूगात टिकून राहण्यासाठी शिक्षक व विदयार्थी या दोन्ही घटकांना आवश्यकता आहे आंतरक्रियात्मक अध्यापनाची वैयक्तिक, सामाजिक व राष्ट्रीय स्वरूपात गरज दिसून येते कारण शिक्षणाकडे एकराष्ट्रीय गुंतवणूक म्हणून पाहिले जाते या गुंतवणूकितून जर चांगले उत्पादन प्राप्त झाले तर त्याचा समाज व राष्ट्र विकासासाठी फायदाच होतो

गरज →
- आजच्या ज्ञानाधिष्ठित समाजाची मागणी
- पारंपरिक वर्गाध्यापनातील मर्यादा दूर करण्यासाठी
- शिक्षणाच्या सर्वांगीण विकास साधने हा हेतू साध्य करण्यासाठी
- प्रभावी अध्यापन – अध्ययन प्रक्रियेसाठी
- विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्ती व उच्च विचारशक्तीस चालना देण्यासाठी
- व्यावसायिक वृद्धी साधण्यासाठी
- विद्यार्थ्यांना क्रियाशील बनविण्यासाठी
- मानसशास्त्रीय आधाराने वर्गाध्यापनात आंतरक्रिया
- उत्तम संप्रेषण कौशल्य विकसित करण्यासाठी
- विद्यार्थ्यांमध्ये अभ्यास विषयाची गोडी निर्माण करून न्यूनगंड कमी करण्यासाठी

अशाप्रकारे आंतरक्रिया अध्यापनाची गरज स्पष्ट करता येईल. वरील बाबींपूरतीच याची गरज नाही तर आंतरक्रियात्मक अध्यापन ही आजच्या काळाचीच गरज बनली आहे.

- **आंतरक्रियात्मक अध्यापनाचे महत्त्व:**

आंतरक्रियात्मक अध्यापनाचा योग्यरित्या वापर केल्यास पुढीलप्रमाणे त्याचे महत्त्व आढळून येते.

१. स्वावलंबी बनण्यास मदत होते.


२. कल्पना, ज्ञानाची देवाण घेवाण होते.

३. सहकार्ययूक्त अध्यापन घडून येते.

४. आशय दिर्घकाळ स्मरणात राहतो.

५. आनंददायी अध्ययन घडते.

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - V February 2015
Theme - “ Pedagogy And Teaching Learning ”




| | |
|---|---|
| १ | अध्ययन–अनुभूतीत विविधता आणता येते. |
| २ | विविध तंत्राच्या वापराने अध्यापन मनोरंजक बनते. |
| ३ | विद्यार्थ्यांची अभिव्यक्ती, अभिरूची जाणून घेता येते. |
| ४ | विद्यार्थ्यांच्या अध्ययनातील अडचणी जाणून घेता येतात. |
| ५ | वर्गाध्यापनात जीवंतपणा येतो. |

| | |
|---|---|
| १ | विद्यार्थ्यात नेतृत्त्वगुण विकसित करता येतात. |
| २ | विद्यार्थ्यात समायोजन क्षमता निर्माण करता येते. |
| ३ | संधभावना गटकार्याची भावना निर्माणहोते. |
| ४ | शिक्षक विद्यार्थ्यात एकतानता निर्माण होते. |
| ५ | शाळेतील भीतीयूक्त वातावरण भीतीमूक्त बनते. |

- **आंतरक्रियात्मक अध्यापनासाठी उपयूक्त तंत्रे:(Useful Techniques for Interactive Teaching)**

आंतरक्रियात्मक अध्यापनाचा वापर करीत असतांना शिक्षक विविध तंत्राचा वापर करू शकतात. सहकारयूक्त अध्ययनासाठी वर्गात जे उपक्रम राबविले जातात त्यांचाही वापर या ठिकाणी करता येतो. विद्यार्थ्यांना वर्गाध्यापनात सहभागी करून घेण्यासाठी पुढील तंत्राचा वापर उपयूक्त ठरतो.

Think/pair/share ----- प्रश्न विचारणे

अध्यापनपूर्व आशय वाचन ------ वाचनखेळ

पृच्छा प्रशिक्षण प्रतिमान ------- बुद्धीमंथन

समस्या निराकरण -------- भूमिकापालन

सेमिनार -------- विशेष स्वाध्याय

दिग्दर्शन -------- गटचर्चा

अशाप्रकारे आंतरक्रियात्मक अध्यापनासाठी विविध तंत्राचा वापर करता येतो. वरील तंत्रे उदाहरणादाखल दिलेली आहेत, यापेक्षाही विविध मार्गांनी वर्गात आंतरक्रियात्मक अध्यापन करता येते. कारण All good teachers are interactive teachers.

**संदर्भ**


१. कुंडले (डॉ.) म. बा. अध्यापनशास्त्र व पद्धती व्हीनस प्रकाशन पुणे

२. जगताप (डॉ.) ह. ना. शिक्षणातील नवप्रवाह व नवप्रवर्तने नित्यनूतन प्रकाशन पुणे

३. पिचड (डॉ.) नलिनी, बरकले (डॉ.) रामदास मातृभाषा मराठीचे अध्यापनशास्त्रीय विश्लेषण इनसाईट पब्लिकेशन नाशिक (२००७)

४. महाले (डॉ.) संजीवनी अध्यापन प्रतिमाने व अध्ययन शैली इनसाईट पब्लिकेशन्स नाशिक (२००६)

५. चव्हाण (डॉ.)गणेश अध्ययन अध्यापन: पारंपारिक ते आधुनिक नित्यनूतन प्रकाशन पुणे